पुणे महानगरपालिकेच्या कामा करिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : २६/१२/२००८

पुणे महानगरपालिका

✷ सूचना ✷

(मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) एच व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ११**

**डिसेंबर २००८**

**मा. ॲड. अविनाश साळवे, मा. दिलीप उंबरकर, मा. विरेंद्र किराड, मा. संदीप लडकत, मा. वसंत मोरे व मा. सुनिल बनकर या स्थायी समितीच्या ६ (सहा) मा. सभासदांकडून दिनांक २३/१२/२००८** रोजी लेखी मागणी(रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची **विशेष (खास ) सभा बुधवार,दिनांक ३१/१२/२००८** रोजी **दुपारी ४=०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात)** भरेल.

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**विषय क्रं. ४११**

संदर्भ :– मा.शिक्षण मंडळ ठराव क्र. १११ दि. २९/८/२००८.

––––

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २००८ – २००९ चे दुरुस्त व पुरवणी अंदाजपत्रक खालीलप्रमाणे मान्य करण्याबाबत पुणे मनपाकडे शिफारस करण्यात येत आहे.

| | जमा बाजू | रुपये | | खर्च बाजू | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १) | वर्षारंभीची शिल्लक | १५,३०,१४,४१० | १) | सेवकवर्ग पगार | ६८,६६,००,००० |
| २) | पुणे मनपा हिस्सा | ९३,२७,१०,५९० | २) | कार्यालय खर्च | ३८,४५,००० |
| ३) | शासकीय अनुदान | २८,००,००,००० | ३) | प्राथमिक शाळा खर्च | ३१,१२,५०,००० |
| ४) | इतर जमा | ८८,२०,००० | ४) | सेवानिवृत्ती वेतन, ग्रॅच्युइटी | १८,००,५०,००० |
| ५) | अनामत, उचल व विश्वस्त निधी व्याज | २,४२,०४,००० | ५) | खाजगी शाळा अनुदान | १०,००,००,००० |
| | | | ६) | नैमित्तीक खर्च | ९,२७,५०,००० |
| | | | ७) | अनामत उचल व विश्वस्त निधी व्याज | २,४२,०४,००० |
| | | | ८) | वर्षाअखेरची शिल्लक | ५०,००० |
| | **एकूण रुपये** | १,३९,८७,४९,००० | | **एकूण रुपये** | १,३९,८७,४९,००० |

**(टिप :– शिक्षण मंडळाचे सन २००८ – २००९ चे दुरुस्त व पुरवणी अंदाजपत्रकात योग्य त्या दुरुस्त्या व फेरफार करुन ते मान्य करण्यासंबंधी स्थायी समिती ठ. क्र. १७०४,दि. १८/१२/२००८ ने मनपाकडे शिफारस आहे.)**

**विषय क्रं. ४१२**

संदर्भ :– शिक्षण मंडळ ठराव क्रं. ११२, दि. २९/८/२००८.

––––

पुणे मनपा शिक्षण मंडळाचे सन २००९ – २०१० चे मूळ अंदाजपत्रक खालीलप्रमाणे मान्य करण्याबाबत पुणे मनपाकडे शिफारस करण्यात येत आहे.

| | जमा बाजू | रुपये | | खर्च बाजू | रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १) | वर्षारंभीची शिल्लक | ५०,००० | १) | सेवकवर्ग पगार | ७२,९८,६०,१०० |

टिप :–

१) शिक्षण मंडळाने सादर केलेले जमा व खर्चाचे सन २००९ – २0१० चे मूळ अंदाजपत्रक स्थायी समिती ठ.क्र. १७०५,दि. १८/१२/२००८ ने योग्य त्या दुरुस्ती व फेरफार करुन ते मान्य करणे विषयी मनपाकडे शिफारस केली आहे.

२) सन १९४९ च्या मुंबई प्राथमिक शिक्षणाबाबत नियम क्र. १५४ (२) अन्वये सदर अंदाजपत्रक दि.१ जानेवारी पर्यंत (बाय दि फस्ट जानेवारी) मुख्य सभेने मान्य करावयास पाहिजे.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :– २६/१२/२००८

**मा.महापौर यांचे आज्ञेवरुन,**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**

(टिप :–प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)

पुणे महानगरपालिकेच्या कामा करिता

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक : २/१/२००९

पुणे महानगरपालिका

✷ सूचना ✷

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये
कार्यपत्रिका क्रमांक – १२
(खास सभा)

**खालील नमुद केलेल्या विषयाकरिता पुणे महानगरपालिकेची विशेष (खास ) सभा बुधवार, दिनांक ७/१/२००९ रोजी दुपारी ४:०० (चार) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयाचा विचार होईल.

**विषय क्रं. ४१३**

मा. सौ. डॉ. पूजा यादव यांच्या निधनाने रिक्त झालेल्या नामनिर्देशित सदस्याच्या एका जागेसाठी महाराष्ट्र शासन, नगरविकास विभागाची दि. २१ एप्रिल २००७ च्या अधिसूचनेतील नियम क्र. ५ व ७ नुसार एका नामनिर्देशित सदस्याची नियुक्ती करणेबाबत मा. महापालिका आयुक्त यांचे क्र. मआ/नस/१०८८, दि.२६/१२/२००८ चे पत्र.

**मा.महापौर यांचे आज्ञेवरुन**

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :– २/१/२००९

**उपनगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**(टिप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयाची कागदपत्रे (डॉकेटस) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

नगरसचिव

**पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता**

**पुणे महानगरपालिका – सूचना – कार्यपत्रिका क्र. १३**
**जानेवारी २००९**

पुणे महानगरपालिकेची **मासिक सर्वसाधारण सभा सोमवार, दि.१९ जानेवारी २००९ रोजी दुपारी**

## प्रश्नोत्तरे

मुंबई प्रांतिक म न पा अधिनियम, १९४९ चे कलम ४४ अन्वये प्रश्नोत्तरे.

## स्थायी समितीचे ठराव

**विषय क्र. ४१५**

संदर्भ :– १) नाईकनवरे ॲण्ड असो. यांचे विकास योजना कार्यालयाकडील आ. क्र. डी. पी. ४७६४, दि. २१/१२/२००६ ने दिलेली परचेस नोटीस.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/नअ/१२३७ दि. १२/२/२००७ चे पत्र.
३) स्थायी समिती ठराव क्रं.१९३१,दि.२०/२/२००७.
४) मनपा ठराव क्रं.५५२,दि.१४/३/२००७.
५) मनपा ठराव क्रं.१४६,दि.२८/९/२००७.
६) मनपा ठराव क्रं. ३७१,दि.२०/२/२००८.
७) मनपा ठराव क्र. १३३, दि. २३/७/२००८.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे विचारात घेऊन–

सन १९८७ चे मान्य विकास आराखड्यानुसार पुणे, पेठ हडपसर स.नं. २५ (पै) ही जागा ई.डब्ल्यू.एस.साठी आरक्षित आहे. मान्य विकास आराखड्यानुसार व शासन राजपत्रानुसार स.नं. २५,३०,३१ पै,३२ पै,२३१ पै हडपसर या मिळकती ई.डब्ल्यू.एस.आरक्षणात समाविष्ट असून त्यांचे एकूण क्षेत्र ८ हेक्टर १० आर इतके असून त्यापैकी स.नं. २३१ ब या मिळकतीचे क्षेत्र कमी होऊन एम–३४० नुसार निवासी विभागात समाविष्ट केलेले आहे.

हडपसर स.नं. २५ (पै) ही मिळकत ७/१२ उताऱ्यानुसार स.नं. २५ हि.नं. १ ची मिळकत श्री.तुकाराम सोपान काळे व इतर यांचे मालकीची आहे. या सर्वांनी नाईकनवरे ॲण्ड असो. यांना पॉवर ऑफ ॲटर्नी (पी.ए.एच.) दिलेली आहे. पी.ए.एच. यांनी सदर जागा संपादित करावी तसेच एम.आर.टी.पी.ॲक्ट १९६६ चे कलम १२६ मधील तीनपैकी कोणत्याही कलमानुसार कार्यवाही करणेस तयारी असल्याचे कळविले आहे.

सहा महिन्यांचे आत भूसंपादनाची कार्यवाही सुरु न झाल्यास सदरची मिळकत आरक्षणमुक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सबब सहा महिन्यांचे आत भूसंपादनाची कार्यवाही सुरु होणे क्रमप्राप्त आहे. त्यासाठी भूसंपादन कायदा १९८४ प्रमाणे भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यास मान्यता द्यावी अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४०६, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४१६**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/मुले/१३२५, दि. ६/३/२००७ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं.२०४६, दि.६/३/२००७.
३) मनपा ठराव क्रं.४, दि.२३/४/२००७.
४) मनपा ठराव क्रं.७९, दि.२९/६/२००७.
५) मनपा ठराव क्रं. ३७२, दि.२०/२/२००८.
६) मनपा ठराव क्र. १३४, दि. २३/७/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे विचारात घेऊन –

मलनि:सारण खात्याकडील सन २००६–०७ चे 'क' अंदाजपत्रकातील कमी होणारी कामे व नवीन कामांच्या वर्गीकरणाचा तक्ता मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबत जोडला असून त्याप्रमाणे 'क'

३) कारणे दाखवा नोटीस जा. क्र. सहमआ/खाचौवि/७, दि. ३/४/२००८.

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उका/खाचौवि/१२५, दि. २९/४/२००८ चे पत्र.

५) स्थायी समिती ठराव क्रं. २४८,दि.२७/५/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

श्री. भारत सदाशिव मोरे, नर्सिंग ऑर्डली, आरोग्य विभाग यांचे विरुध्दचे खातेनिहाय चौकशीप्रकरणी त्यांचे विरुध्द सिध्द होत असलेल्या आरोपाचे परिणामी कारणे दाखवा नोटीशीमध्ये प्रस्तावित केलेली शिक्षा कायम करुन त्यांना मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार मनपा सेवेतून काढून टाकण्यास (Removal from Municipal Service) व तशा आशयाचे आज्ञापत्र मा.अति.महा.आयुक्त(ज) यांच्या स्वाक्षरीने प्रसुत करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. २६१, दि. २०/१०/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ४१८</u>**

संदर्भ :– १) शासन निर्णय क्र. सीडीआर–१३०७/प्र.क्र.३/०७/११/–अ दि. १८/१०/२००७.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७.

३) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/सहआ/से/७९ दि. १७/४/२००८ चे पत्र.

४) विधी समिती ठराव क्र. ९ दि. ७/५/२००८.

५) स्थायी समिती ठराव क्र. ५७२, दि. २२/७/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन व स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

पुणे महानगरपालिकेच्या विविध खात्याकडील सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असलेल्या सेवक/अधिकारी यांना कामावर रुजू करुन घेणेस व सहा महिन्यापेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील शासनाच्या नियमाप्रमाणे सहा महिन्यांपेक्षा जास्त कालावधीसाठी ७५% निर्वाह भत्ता देणे यासाठी याबाबत प्रचलित मनपा सेवाविनियम क्र. ५८ मध्ये दुरुस्ती करुन मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबतच्या परिशिष्टाप्रमाणे येथून पुढे कार्यवाही करणेस

२) मा.स्थायी समितीने पारित केलेल्या ठराव क्र. १२७७ दि. १४/१२/२००७ मधील या प्रकरणी निलंबित झालेल्यांसाठी जर सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ निलंबित असेल व दोषारोप सादर केले नसेल आणि पद रिक्त राहत असेल तर दोषारोप सादर होईपर्यंतच्या काळात रुजु करुन घ्यावे याबाबत मे.राज्य शासनाकडून प्रसृत करण्यात आलेल्या अथवा याबाबत मे.राज्य शासनाकडून वेळोवेळी प्रस्तुत करण्यात येणाऱ्या शासन आदेशामधील मार्गदर्शक तत्वांनुसार पुणे महानगरपालिकेमधून निलंबित झालेल्या सेवक/अधिकारी यांचे निलंबन मागे घेणेबाबतची कार्यवाही करणेस

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३८२, दि. १८/१२/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ४१९</u>**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/जनेपुअ/३०९ दि. २०/६/२००८ चे पत्र.

२) म्हाळुंगे गावातील रस्त्याचे डांबरीकरण व गल्लीबोळ कॉँक्रीटीकरण करणे हे काम पुणे मनपा निधीतून आगामी राष्ट्रकुल युवा क्रिडा स्पर्धेपुर्वी करण्यासाठी कामाचे पुर्वगणनपत्रक व टेंडर प्रक्रिया करणेस

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३८३, दि. १८/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४२०**

संदर्भ :– १) गर्व्हमेंट ऑफ इंडिया यांचे सॉलिड वेस्ट (मॅनेजमेंट व हॅन्डलिंग) रुल्स २०००.
२) महाराष्ट्र नॉन बायोडीग्रेबल गार्बेज कंट्रोल अॅक्ट २००६.
३) महाराष्ट्र शासन परिपत्रक क्र.घकव्या/१००१/प्रक्र/५४६ पापु–२२ दि.५ जानेवारी २००२.
४) मा.महा.आयुक्त यांचे क्र.मआ/उआ(घनकचरा व्यवस्थापन)/१३८५,दि. २५/३/२००८ चे पत्र.
५) स्थायी समिती ठराव क्र. ९००, दि. २/९/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

मा.सुप्रिम कोर्ट यांच्या आदेशाप्रमाणे तसेच संदर्भांकिंत कायद्यान्वये निर्माण होणाऱ्या कचऱ्यांचे वर्गीकरण करणे आवश्यक असून कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाटीत कचरा गोळा करणाऱ्या अनेक संस्थांचा सहभाग महत्वाचा आहे. पुणे शहरात रोज सुमारे ३०० मे.टन इतका सुका कचरा कागद काच पत्र कष्टकरी पंचायत व इतर अनेक संघटनांच्या सुमारे ५००० पेक्षा जास्त सदस्यांमार्फत गोळा करुन पुर्नश्चक्रीकरणासाठी पाठविला जात आहे.

सबब पुणे शहरात घरोघरी वर्गीकरण केलेल्या कचऱ्याचे संकलन करणाऱ्या निवड केलेल्या सहकारी संस्थेमध्ये अशा प्रकारचे काम करणाऱ्या इतर संस्थांचा समावेश करणेबाबत खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

अ) मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रात प्रस्तावित केलेल्या धोरणाच्या बाबीस मान्यता मिळणेस,

ब) १. पुणे शहराच्या विविध भागात घन कचरा विषयक कामकाज करणाऱ्या संस्था निवडणे

२. पुणे मनपाच्या अंदाजपत्रकातील तरतुदीतून आवश्यकतेप्रमाणे निवड केलेल्या संस्थेला गणवेश, संरक्षक हातमोजे, विमा संरक्षण इ.आवश्यक अंदाजपत्रकामध्ये तरतूद करणे व त्यानुसार वरील साहित्य व सुविधा संस्थेला पुरविणे

३. निवड केलेल्या सहकारी संस्थेला सुरवातीच्या काळात अत्यावश्यक सेवकवर्गाचे मानधन, जनजागृती मोहिम व प्रशिक्षण इ.बाबीसाठी वा वेळोवेळी करण्यात येणाऱ्या बजेट तरतुदीप्रमाणे रक्कम अदा करणे

४. निवड केलेल्या सोसायटीचे कामकाज समाधानकारक नसल्यास या संस्थेला पुणे मनपातर्फे देण्यात येणारी मदत तात्काळ थांबविणे व पर्यायी व्यवस्था करणे व याबाबतचा निर्णय घेण्याचा व प्रसंगी उदभवणाऱ्या सर्व अडचणी प्रश्नांबाबत निर्णय घेणे

५. सदरच्या धोरणाप्रमाणे पुणे शहरात अंमलबजावणी करणे

वरील अनुक्रमांक अ ते ब मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबीसंदर्भात निर्णय घेण्याचे व कार्यवाही करण्याचे महापालिका आयुक्त यांना अधिकार देणेस

क) सदरचा खर्च हा घनकचरा व्यवस्थापनाच्या योग्य त्या अर्थशिर्षकामधून करणेस.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४०८, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४२१**

संदर्भ :– १) जनेराशपुअकडील पत्र जा.क्र. मआ/जेएनएनयुआरएम/३०० दि. २/६/२००८ चे पत्र.
२) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/५५१ दि. २०/८/२००८ चे पत्र.

सभेच्या मान्यतेने देण्यात येणाऱ्या जागा यांची भाडेपट्टा मुदत ९९ वर्षापर्यंत ठेवणेसाठी पुणे महानगरपालिकेस अनुमती देणेची शासनास मागणी करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४०९, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४२२**

संदर्भ :– १) मा.संदिप लडकत, मा.अशोक येनपुरे, मा.सुनिल बनकर, मा.अनिल जाधव यांचे दि. १७/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०३२, दि. १७/९/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

विकेंद्रीकरण धोरणानुसार क्षेत्रिय कार्यालये व उपायुक्त कार्यालय स्तरावरुन जाहिरात देण्याचे कामकाज सुरु करण्यात आलेले असून जाहिरात वितरण, जाहिरात बिले व तदनुषंगिक कामात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. तसेच १४ क्षेत्रिय कार्यालये स्तरावर शहराच्या विविध भागात मनपाचे होणारे विविध कार्यक्रम पाहणी दौरे, प्रोटोकॉल विषयक कामे, प्रसारमाध्यमांशी समन्वय या प्रमाणात मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली असल्याने व सर्व कामे ही कालमर्यादेची असल्याने ४ उपायुक्त कार्यालयात प्रत्येकी १ याप्रमाणे ४ सहाय्यक जनसंपर्क अधिकारी वर्ग–२ (शैक्षणिक पात्रता–कोणत्याही शाखेची पदवी, मान्यताप्राप्त विद्यापीठाची पत्रकारीता पदवी/पदविका व प्रोटोकॉल विषयक कामाचा अनुभव व संगणक पदवी/पदविका/संगणक साक्षर) पदे निर्माण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४१०, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४२३**

संदर्भ :– १) मा.अनिल जाधव व मा.अरुण धिमधिमे यांचे दि. १६/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०४६, दि. २३/९/२००८.

–––

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

श्री.अनिल बबनराव चिव्हे, बिगारी, ढोलेपाटील क्षेत्रिय कार्यालय, पाणीपुरवठा विभाग यांची नगरसचिव कार्यालयाकडे बिगारी म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४११, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४२४**

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(जिंघ)/से/६३३ दि. १६/९/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १०७१, दि. २३/९/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

श्री छत्रपती शिवाजी तंत्र माध्यमिक शिक्षण केंद्राकडील मुख्याध्यापक श्री.नंदकिशोर चंद्रकांत रहातेकर यांनी मनपा सेवेत प्रवेश करताना सादर केलेले जातीचे प्रमाणपत्र विभागीय जाती पडताळणी समिती, नागपूर यांनी अवैध ठरविले आहे. श्री.रहातेकर यांनी मनपा प्रशासनाची दिशाभूल केल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२)(ग) नुसार पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून काढून

पुणे म.न.पा.चे नगरसचिव कार्यालयाचे संर्किण या शिर्षकातून सर्व पक्षनेते यांचे कार्यालयातील चहापान खर्चास प्रत्येकी र.रू.५०,०००/– वर्षाला देण्यास धोरणात्मक मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४१६, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्रं. ४२६**

संदर्भ :– १) मा.सागर माळकर,मा.तानाजी लोणकर यांचे दि.१६/७/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ६१६, दि. २२/७/२००८.
३) मा.सौं.रेखा टिंगरे व मा.सुनिल गोगले यांचे दि.१.८.२००८ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. ७३०, दि. १२/८/२००८
५) मा.मुख्य लेखा परिक्षक यांचे क्रं. मूलेप/३२२ दि.१२/८/०८ चे पत्र.
६) स्थायी समिती ठराव क्र. ८२९ दि. २६/८/२००८.
७) मा.महा.आयुक्त यांनी क्र.मआ/कर/६७० दि. २९/९/२००८ ने पाठविलेला अभिप्राय.
८) स्थायी समिती ठराव क्र. १२२१, दि. ६/११/२००८.

विषय :– पुणे मनपाच्या क्षेत्रातील स्वातंत्र्य सैनिकांना मिळकत करातील सर्वसाधारण कर माफ करणेबाबतच्या शासन निर्णयास अनुसरून माजी सैनिक अथवा त्यांच्या विधवा पत्नींच्या नावाने असलेल्या एका मिळकतीवर त्यांच्या एका करामध्ये संपूर्ण सवलत देणेबाबत.

–––

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून.....

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९, कलम १२९ ते १३८ तरतुदीचा विचार करता माजी सैनिक व त्यांच्या विधवा पत्नींस मिळकत करांअंतर्गत आकारण्यात येणा–या विविध सर्व करांस संपूर्ण माफी देणे व शहराच्या विकासामध्ये स्नेहाचा वाटा असणा–या ज्येष्ठ नागरिकांना मिळकत करांमध्ये ५ % सूट देणे उचित होणार नाही .

सांगली महानगरपलिकेने वीरमाता, वीरपत्नी आणि माजी सैनिक, निवृत्त वेतनधारक व युध्दात अपंगत्व आलेले सैनिक यांच्या घरपट्टीमधील सर्वसाधारण करात १००% सूट देणेबाबत ठराव संमत कायदयातील दुरुस्तीबाबत सदर प्रस्ताव शासनाकडे पाठविला असून त्यास अदयाप मान्यता नसल्याने अंमलबजावणी केली नाही.

पुणे शहराच्या विकासासाठी मिळकत करापोटी जमा होणारी रक्कम हे महत्वाचे स्त्रोत असल्याची बाब विचारात घेता, माजी सैनिकांना त्यांच्या नावे असलेल्या अगर सैनिकांस वीरमरण आलेल्या त्याच्या पत्नीस मिळकत करांमधील सर्वसाधारण कर खालील अटींस अधिन राहून माफ करता येईल.

१. मिळकतकराअंतर्गत असलेल्या सर्वसाधारण करांस माफी देणे. इतर सर्व कर वसूल करणेस.

२. माजी सैनिक हा निवृत्त वेतनधारक असावा किंवा त्यास युध्दामध्ये अपंगत्व आलेले असावे. ( सैन्यदलामध्ये कमीत कमी १५ वर्षे सेवा केलेले असावे. )

३. शहीद माजी सैनिकाची वीर पत्नी अथवा शहीद माजी सैनिकाची वीर माता अथवा पिता या तिन्हीपैकी एकाच मालमत्ता धारकांस व त्याच्या एकाच मिळकतीस सदर योजनेचा लाभ देता येईल.

४. लाभार्थी यांनी प्रत्येक वर्षी हयात असल्याबाबत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांचेकडून प्रमाणपत्र देणे बंधनकारक राहील. निवृत्तवेतनधारक, माजी सैनिक, युध्दामधील जखमी सैनिक/ शहीद सैनिकाची माता/ पिता/ पत्नी यांचेपर्यतच अबाधित राहील त्यांचे मृत्यूनंतर सदर योजनेचा लाभ त्यांचे वारसांना देता येणार नाही.

५. माजी सैनिक/ दिवंगत सैनिकांची माता / पिता/ पत्नी यांनी सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लेखी मागणी करणे आवश्यक असून त्यासोबत डिसचार्ज पुस्तकाची छायांकित प्रत निवृत्त वेतन घेत

**<u>विषय क्रं. ४२७</u>**

संदर्भ :– १) मा.नगरसचिव यांचे क्र. १५३८ दि. ११/६/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४४० दि. १६/६/२००८.
३) मा.अविनाश साळवे व मा.दिलिप उंबरकर यांचे दि. २४/६/२००८ चे फेरविचाराचे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. ४९६ दि. २४/६/२००८.
५) मा.विरेंद्र किराड, मा.अविनाश साळवे यांचे दि. १/७/२००८ चे पत्र.
६) स्थायी समिती ठराव क्र. ५२९ दि. २२/७/२००८.
७) स्थायी समिती ठराव क्र. ७०५ दि. १२/८/२००८.
८) स्थायी समिती ठराव क्र. ९०१ दि. २/९/२००८.
९) मा.अशोक येनपुरे, मा.सौ.ज्योत्स्ना सरदेशपांडे, मा.दिलिप उंबरकर व मा.विरेंद्र किराड यांची उपसूचना.
१०) स्थायी समिती ठराव क्र. १०२३ दि. १७/९/२००८.
११) मा.सहाय्यक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), विधानभवन, पुणे विभाग, पुणे १ यांनी क्र. मावक/वशी/८१८/०८ दि. २२/१०/२००८ रोजीचे पाठविलेले पत्र.
१२) स्थायी समिती ठराव क्र. १३६२, दि. १८/११/२००८.

–––

मा.नगरसचिव यांनी शिफारस केल्याप्रमाणे–

नगरसचिव कार्यालयाकडील स्वीय सहाय्यक, अध्यक्ष–स्थायी समिती व अति.कार्यालय अधिक्षक या पदावर खालील नमुद केलेल्या सेवकाची त्यांचे नावापुढे दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(२) नुसार सेवाविनियम १० अ नुसार परिविक्षाधिन पध्दतीने बढतीने हंगामी नेमणुक करणेस मान्यता द्यावी, अशी मा. मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्रं | सेवकांचे नाव | सध्याची वेतनश्रेणी | बढती/भरतीची वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| **१)** | **श्री.अविनाश गुंडाजी क्षिरसागर** | **ज्येष्ठ समिती लेखनिक (वे.श्रेणी रु. ५१५० ते ११३५० + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे.** | **स्वीय सहाय्यक, अध्यक्ष, स्थायी समिती (वे.श्रेणी रुपये ५३०० ते ११८००+ मान्य भत्ते + रुपये ९००/– स्पे.पे. दरमहा+मो.सा. अलौन्स)** | **श्री.ताजमोहमंद अब्दुल हमीद, यांचे सेवानिवृत्तीने रिकाम्या झालेल्या जागेवर** |
| **२)** | **श्री.राजेंद्र हरिभाऊ शेवाळे** | **ज्येष्ठ समिती लेखनिक (वे.श्रेणी रु. ५१५० ते ११३५० + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे.** | **अति.कार्यालय अधिक्षक (वे.श्रेणी रुपये ५३०० ते ११८००+ मान्य भत्ते + रुपये ९००/– स्पे.पे. दरमहा)** | **श्री.मनोहर शंकर कांबळे यांचे सेवानिवृत्तीने रिकाम्या झालेल्या जागेवर** |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३३७, दि. २४/११/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. ४२८</u>**

संदर्भ :– १) मा.नगरसचिव यांचे क्र. १८२१ दि. २४/६/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. ४९७ दि. २४/६/२००८.
३) मा.विरेंद्र किराड, मा.दिलिप उंबरकर, मा.पृथ्वीराज सुतार, मा.मुरलीधर मोहोळ, मा.दत्ता खाडे व मा.वसंत मोरे यांचे दि. ३०/६/२००८ चे पत्र.
४) स्थायी समिती ठराव क्र. ५३० दि. २२/७/२००८.

मा.नगरसचिव यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेऊन –

नगरसचिव कार्यालयाकडील ज्येष्ठ समिती लेखनिक व समिती लेखनिक या पदावर खालील नमुद केलेल्या सेवकाची त्यांचे नावापुढे दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३(२) नुसार सेवाविनियम १० अ नुसार परिविक्षाधिन पध्दतीने बढतीने हंगामी नेमणुक करणेस मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अ.क्रं | सेवकांचे नाव | सध्याचे पद व वेतनश्रेणी | बढतीचे पद व वेतनश्रेणी | शेरा |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.दादाभाऊ पोशा पोटे (अ.ज.) | समिती लेखनिक वे.श्रेणी रु. ५००० ते ११११२५ + ९००/– स्पे.पे. + मान्य भत्ते | ज्येष्ठ समिती लेखनिक (वे.श्रेणी रु. ५१५० ते ११३५० + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे. | श्री.अविनाश गुंडाजी क्षिरसागर यांचे बढतीने रिकाम्या होणाऱ्या जागेवर |
| २) | श्री.मोहन सोमजी देवकर (खुला) | समिती लेखनिक वे.श्रेणी रु. ५००० ते ११११२५ +९००/– स्पे.पे. + मान्य भत्ते | ज्येष्ठ समिती लेखनिक (वे.श्रेणी रु. ५१५० ते ११३५० + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे. | श्री.राजेंद्र हरिभाऊ शेवाळे यांचे बढतीने रिकाम्या होणाऱ्या जागेवर. |
| ३) | श्री.पोपट सोपान आडसूळ (खुला) | ज्यु.ग्रेड लेखनिक वे.श्रेणी रु. ३०५० ते ७१५० + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे. | समिती लेखनिक वे.श्रेणी रु. ५००० ते ११११२५ + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे. | श्री.मोहन सोमा देवकर यांचे बढतीने रिकाम्या होणाऱ्या जागेवर |
| ४) | श्री.विष्णू अर्जुन कदम (अ.जा.) | ज्यु.ग्रेड लेखनिक वे.श्रेणी रु. ३०५० ते ७१५० + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे. | समिती लेखनिक वे.श्रेणी रु. ५००० ते ११११२५ + मान्य भत्ते + ९००/– स्पे.पे. | श्री.दादाभाऊ पोशा पोटे यांचे बढतीने रिकाम्या होणाऱ्या जागेवर |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.३३८, दि. २४/११/२००८ चा झाला आहे.)

<u>विषय क्र. ४२९</u>

संदर्भ :– १) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/उआ(गवनि)मंडई/७९५, दि. १०/११/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १३८२, दि. १८/११/२००८.

–––

मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

म.फुले मंडईच्या नियंत्रणाखालील कोतवाल चावडी येथील पे ॲण्ड पार्क दुचाकी वाहनतळाचा पास फी वसुलीचा मक्ता देणेकामी निविदा मागविल्या असता आलेल्या दोन निविदांपैकी श्री.अमोल सतिश चव्हाण यांची निविदा सर्वात जास्त रकमेची असल्याने त्यांना सदरचा वाहनतळ मक्ता देणे प्रकरणी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) टेंडरदार श्री.अमोल सतिश चव्हाण यांनी देऊ केलेली प्रथम वर्षाची र.रुपये ११,५३,७००/– तसेच पुढील दोन वर्षाकरीता प्रथम वर्षाच्या मक्ता रकमेत प्रतिवर्षी १२% वाढ करुन येणाऱ्या रक्कमेस सन २००८–२०११ या तीन वर्षासाठी प्रत्यक्ष ताबा दिनांकापासून वाहनतळ पास फी वसूलीचा मक्ता देण्यास व त्याकरीता त्यांच्याशी करारनामा करण्यास

२) टेंडरदाराने टेंडर रकमेव्यतिरिक्त संबंधित वाहनतळाचे विद्युत बिल स्वत: भरावयाचे असून साफसफाईची कामे स्वत: करावयाची आहेत.

३) वाहनतळाची ठेक्याची प्रथम वर्षाची र.रुपये ११,५३,७००/– आगाऊ भरणा केल्यानंतरच वाहनतळाचा ताबा देण्यास

४) पहिल्या टेंडरदाराने मक्त्याची रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करुन दुसऱ्या क्रमांकाच्या टेंडरदारास मक्ता देण्यास व त्यांच्याबरोबर करारनामा करण्यास तसेच पहिल्या व दुसऱ्या क्रमांकाच्या टेंडरदाराने असमर्थता दर्शविल्यास त्यांची अनामत रक्कम जप्त करुन नविन निविदाप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वाहनतळ मनपा मंडई विभागाच्या ताब्यात घेऊन पास फी वसूली करण्यास.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८८, १६८ पुणे मनपा वसाहती नव्याने बांधणे, वाकडेवाडी, पांडवनगर, राजेंद्रनगर, आंबिलओढा घोरपडे पेठ क्र. ८–९ राजेवाडी, एकूण तरतूद र.रुपये २,१२,५०,०००/– | ५४ लाख | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्र. १०० येथील कै.नारायण देवचंद भामरे सांस्कृतिक भवन व व्यायामशाळेचे बांधकाम करणे व विविध विकासाची कामे करणे | --- | ५४ लाख |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४१७, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४३१**

संदर्भ :– १) मा.अनिल जाधव व मा.विरेंद्र किराड यांचे दि. २०/११/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४२९, दि.२५/११/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ११५ लक्ष्मीनगर येथे पोहोण्याचा तलाव बांधणेसाठी र.रुपये १ कोटीचे वर्गीकरण करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, भांडवली अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८८, अ.क्र. १६८, पुणे मनपा वसाहती नव्याने बांधणे, वाकडेवाडी, पांडवनगर, राजेंद्रनगर, अंबिलओढा, घोरपडे पेठ क्र. ८ व ९ राजेवाडी (एकूण तरतूद रुपये २,१२,५०,०००/–) | १ कोटी | --- |
| **नविन सुचविलेले काम** | | |
| वॉर्ड क्रं. ११५ लक्ष्मीनगर येथे पोहोण्याचा तलाव बांधणे. | --- | १ कोटी |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४१८, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४३२**

संदर्भ :– १) मा.दिलिप उंबरकर व मा.शंकरराव बेलदरेपाटील यांचे दि. २५/११/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्रं. १४६६, दि.२५/११/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

वॉर्ड क्रं. ९४ मध्ये रिमिक्स कॉंक्रीटचे रोड करणेकामी र.रुपये २५ लाखाचे व वॉर्ड क्र. ५९ येथील सामराज्य सोसायटीवरील ओढ्यावर सिमाभिंत बांधणेसाठी र.रुपये २५ लाखाचे खालीलप्रमाणे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २००८–०९ चे अंदाजपत्रक, भांडवली अंदाजपत्रक, १२.भवने, भूमी व चाळी यांची व्यवस्था, पान क्र. १८८, अ.क्र. १६८, पुणे मनपा वसाहती नव्याने बांधणे, वाकडेवाडी, पांडवनगर, राजेंद्रनगर, अंबिलओढा, घोरपडे पेठ | | |

२)  स्थायी समिती ठराव क्र. १६००, दि. १०/१२/२००८.

---

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपा शिक्षण मंडळाकडील १९९ गणेश पेठ, सिध्दी विनायक प्रा.शाळा इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील क्षेत्रफळ २५१ चौ.मी. ५ वर्गखोल्या व दुसऱ्या मजल्यावरील क्षेत्रफळ २५१ चौ.मी. ५ वर्ग खोल्या ११–११ महिने कालावधीसाठी भाडे तत्वावर देणेकामी निविदा मागविल्या असता जवाहर शिक्षण मंडळ, श्रीमती यशवंती दुबल, १०२८ रविवार पेठ, पुणे २ यांची एकच निविदा आली असून ती मनपाने निर्धारित केलेल्या अपेक्षित भाडे दरापेक्षा जास्त असल्याने त्यांच्याकडून उपरोक्त वर्गखोल्या अनुक्रमे र.रुपये ११,३१५/– व र.रुपये १३,०००/– प्रतिमहा भाडे स्विकारुन ११ महिन्यांसाठी भाडे तत्वावर चालविणेस देणेस तसेच मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी २.५ टक्के भाडेवाढ करणेस व याकरिता त्यांचेशी आवश्यक तो करारनामा करणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या निविदा धारकाने वेळच्या वेळी भरणेस व ताबा देण्यापुर्वी ६ महिन्यांचे मासिक भाडे रक्कम अनामत म्हणून व ३ महिन्यांचे आगावू मासिक भाडे स्विकारुन भाडे तत्वावर देणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ४३४</u>**

संदर्भ :–  १)  मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूजिं)/४१८ दि. १८/७/२००८ चे पत्र.

२)  स्थायी समिती ठराव क्र. १६०२, दि. १०/१२/२००८.

---

स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरुन –

येरवडा सि.स.नं. १९८९ स.नं. १०३, हिस्सा नं. १३१ अ या मिळकतीमध्ये पुणे मनपाकडून बांधण्यात आलेल्या बाबु जगजीवनराम प्राथमिक शाळेच्या जागेच्या मालकास नुकसान भरपाई देण्याबाबतचे मा.महा.आयुक्त यांचे संदर्भांकिंत पत्र दप्तरी दाखल करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ४३५</u>**

संदर्भ :–  १)  मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे क्र. मआ/उआ(जिंघ)/से/९९६ दि.८/१२/२००८चे पत्र.

२)  स्थायी समिती ठराव क्र. १६४४, दि. १६/१२/२००८.

---

मा.अति.महा.आयुक्त(वि) यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

श्री.लोखंडे सु.अ., अंतर्गत अर्थान्विक्षक (वेतनश्रेणी रुपये ६५०० ते १४७५०) यांनी दि. १/३/२००७ ते ४/४/२००७ अखेर तसेच श्रीमती पेडणेकर दिपाली श्रीदत्त, उपमुख्यलेखापाल (वेतनश्रेणी रुपये १०००० ते २०२५०) यांनी दि. ५/४/२००७ ते ८/५/२००८ अखेर स्वत:चे पदाचे काम सांभाळून मुख्य लेखापरिक्षक (वेतनश्रेणी रुपये १०६५० ते २२१५०) ह्या प्रथम श्रेणी संवर्गातील रिक्त पदाचा अतिरिक्त पदभार पाहिल्यामुळे त्यांना ५% विशेष वेतन किंवा जास्तीत जास्त रुपये ७५०/– दरमहा विशेष वेतन आदा करणेस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

**<u>विषय क्र. ४३६</u>**

संदर्भ :–  १)  पुणे डिस्ट्रीक्ट इंटर ऑफीसेस स्पोर्टस असोसिएशन यांचे दि. २२/१०/२००८ चे पत्र.

२)  मा.महापौर यांचे जा.क्र. ३८०१ दि. ४/११/२००८.

३)  मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/उआ(ज)/९७० दि. ५/१२/२००८ चे पत्र.

**<u>विषय क्र. ४३७</u>**

संदर्भ :- १) मा. विजय देशमुख व मा. सागर माळकर यांचे दि. १६/९/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १०४७, दि. २३/९/२००८.

३) मा. मुख्य सभा विषय क्र. २६५, ठराव क्र. २८८, दि. २३/१०/२००८.

४) मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र.मआ/अतिक्रमण/९७२ दि. ५/१२/२००८ ने पाठविलेला अभिप्राय.

५) स्थायी समिती ठराव क्र. १६८९, दि. १६/१२/२००८.

विषय :- हडपसर सोलापूर रोड कॅनॉलवर माळवाडीकडे जाणाऱ्या रोडलगत स्लॅब टाकून हॉकर्सचे पुनर्वसन करणेबाबत.

---

अधिकृत व अनधिकृत व्यवसायिकांचे पुनर्वसन करण्यासाठी सुचविण्यात आलेली उपरोक्त जागा कॅनॉलपैकी असून ती पाटबंधारे विभागाचे कार्यकक्षेत असल्याने सदर कॅनॉलवर महानगरपालिकेने स्लॅब टाकून कॅनॉल बंदिस्त करणे उचित होणार नाही. त्यामुळे संदर्भांकित विषयाचा विचार करणे शक्य होणार नाही.

अशा आशयाचा मा.अति.महा.आयुक्त(ज) यांनी पाठविलेला अभिप्राय अवलोकन करुन स्विकृत करण्यास मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

## विधी समितीचा ठराव

**<u>विषय क्रं. ४३८</u>**

संदर्भ :- १) महाराष्ट्र राज्य शासन, उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. आय टीपी/२००३/सीआर ३३११/ आयएनडी -७, दि. १२/७/२००३ चे धोरण.

२) मा.मुख्य सभा ठराव क्र. ४७४, दि. २७/११/२००३ अन्वये दिलेली अंतिम मान्यता.

३) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. पी.एम.सी. ३००५/३७४/प्र.क्र. ८२/०६ नवि - २२, मंत्रालय मुंबई - ३२, दि. २५/९/२००६

४) (अ) मास्टेक लि.(ब) सिंटेल लि.(क) ॲटोमेटेड सिक्युरिटीज क्लिरन्स इंडिया प्रा.लि.या कंपन्याचे मुदतवाढीचे अर्ज.

५) महाराष्ट्र शासन उद्योग, उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.आया टी पी २००८/ प्रकरण क्र.७८/उद्योग २, मंत्रालय मुंबई - ३२, दि. ६/६/२००८.

६) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आयातकर/४१६, दि. १८/७/२००८ चे पत्र.

७) विधी समिती ठराव क्र. २३, दि. ५/११/२००८.

---

मा. महा.आयुक्त यांनी त्यांचे पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

महाराष्ट्र शासन उद्योग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र. आय.टी.पी.२००८/सीआर ७८ /आयएनडी २ मंत्रालय, मुंबई ३२, दि. ६/६/२००८ चे पत्रानुसार व मुख्य सभा ठ.क्र. ४७४, दिनांक २७/११/२००३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे नविन माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण २००३ अंतर्गत सॉफ्टवेअर विकसित करणा-या घटकाचे आयात मूळ भांडवली वस्तू व त्यांस लागणा-या कच्च्या आयात मालावर जकात माफी संदर्भात महाराष्ट्र शासन राजपत्र २२/३/२००७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या यादीतील आयात होणा-या मालावर जकातीची माफीस दि. ३१/१२/२००८ अखेर मुदवाढ देणेस मान्यता मिळाल्यास व याकरिता मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १२७(२) ४५४, ४५५, ४५७(७), (१७) सह कलम १४९ मधील तरतूदीनुसार आवश्यक ती कार्यवाही सुरू करणेस मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :- सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव

६) मनपा ठराव क्र. १, दि. २३/४/२००७.

७) मनपा ठराव क्र. ९०, दि. ३०/७/२००७.

८) मनपा ठराव क्र. २५८, दि. २६/११/२००७.

९) मनपा ठराव क्र. ५९, दि. २१/५/२००८.

१०) मनपा ठराव क्र. २२१, दि. २३/९/२००८.

विषय :– पुणे पेठ हडपसर,मगरपट्टा,टाऊनशिप मधील पश्चिम हद्दीवरील एच. सी. एम. टी. आर. नं.२४ मी. डी.पी.रस्त्याच्या आखणीत अदलाबदल करणेबाबत.

–––

मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्र अवलोकन केले.

शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन –

पुणे शहरात एच.सी.एम.टी.आर.ची अलाईनमेंट बदलली तर अशा प्रकारची मागणी शहरातील अन्य विकसक सुध्दा करतील व असे करणे शहराच्या नियोजनाचे हिताचे नाही.

प्रशासनाने पुणे शहरातील एच.सी.एम.टी.आर. रोड अलाईटमेंट बाबत कोणतेही बदल सुचवू नयेत व सदरचे रस्ते अस्तीत्वातील नकाशाप्रमाणे ठेवण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४१३, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ४४०</u>**

संदर्भ :– १) मा. उज्वल केसकर व मा. दत्तात्रय खाडे यांचे दि. १८/४/२००७ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १४, दि. ९/५/२००७.

३) मा. महा.आयुक्त यांनी जा. क्र.मआ/नअ/१७७,दिनांक १३/६/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.

४) मा. अविनाश जाधव, उपाध्यक्ष, शहर सुधारणा समिती व मा. भिमराव तापकिर यांची दि. ६/७/२००७ ची उपसूचना.

५) शहर सुधारणा समिती ठराव क्रं.१०७,दि.६/७/२००७.

६) मनपा ठराव क्र. २६०, दि. २६/११/२००७.

७) मनपा ठराव क्र. ६०, दि. २१/५/२००८.

८) मनपा ठराव क्र. २२२, दि. २३/९/२००८.

–––

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अवलोकन केला.

शहर सुधारणा समितीची शिफारस विचारात घेऊन –

मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अंशत: मान्य करण्यात येत आहे. तसेच नियोजन प्राधिकारणाला राज्य सरकारच्या परवानगी R. P. मध्ये बदल करण्याचा अधिकार आहे. सबब पुणे मनपा हद्दीत नव्याने समाविष्ट झालेल्या २३ गावांच्या प्रारुप विकास आराखड्यामध्ये राज्य सरकारच्या परवानगीने D. P. शी सुसंगत R. P. मध्ये बदल करण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र.४१४, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्रं. ४४१</u>**

संदर्भ :– १) मा. मोहनसिंग राजपाल, मा. सौ. निर्मला हिरे यांचे दि. २७/१०/२००५ चे पत्र.

२) शहर सुधारणा समिती ठराव क्र. २७७, दि. २४/११/२००५.

३) मा.महा. आयुक्त यांनी क्रं. मआ/नअ/२९४, दि. ३१/७/२००७ ने पाठविलेला अभिप्राय.

अन्वये मान्यता दिलेली आहे.

तरी स. नं. १९१ व १९२ च्या पूर्वेकडील हद्दीवरील सिमाभिंतीलगत सुमारे १४५ मी. रुंदीचा व ९.० मी. रुंदीचा कलम २०५ चा रस्ता आखण्यास मान्यता द्यावी अशी मुख्य सभेकडे शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४१५, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ४४२</u>**

संदर्भ :– १) मीरा दामोदर कोसंबी यांचे दि. २८.१२.२००७ चे पत्र.
२) मा. महा.आयुक्त यांचे क्र.मआ/नअ/१३२८, दि. ५.३.२००८ चे पत्र.
३) मा. अविनाश बागवे व मा. विजय मारटकर यांचे दि. २४.७.२००८ ची उपसूचना.
४) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. ८६, दि. २४/७/२००८.

---

शहर सुधारणा समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार –

पुणे पेठ शिवाजीनगर ओ. प्लॉट नं.१८६ सि.स.नं. ८२५ या मिळकतीचा भाग विकास आराखड्यामध्ये असितत्वातील रस्ता म्हणून दर्शविला असून बी फॉर्म मालकी हक्क पुणे मनपा असे असून शेरा मध्ये road area of B.O.R.I. lay out public road in the final scheme nominal compensation Rs. 1 for area to be given to B.O.R.I. असे नमूद केले आहे. यास्तव संपूर्ण ओ. प्लॉट नं.१८६ सि.स.नं. ८२५ चे रस्ता रद्द करून निवासी करणेकामी एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ९२ व ३७(१) अन्वये व्हेरियेशन चालू करण्याचा प्रस्ताव दाखल असून या बाबत ओ. प्लॉट नं.१८६ चे एकूण क्षेत्रापैकी फक्त प्लॉट नं.१४० ते १४५ या मिळकतीमधील ओ. प्लॉट नं.१८६ चे क्षेत्र निवासी करणेबाबत एम.आर.टी.पी. ॲक्ट १९६६ चे कलम ९२ व ३७(१) अन्वये कार्यवाही करण्यासाठी त्यादृष्टीने सदर कार्यवाहीचा भाग म्हणून शासकीय राजपत्र व दैनिक इंग्रजी, मराठी वृत्तपत्रात जाहीर प्रकटन देऊन नागरिकांचा हरकती व सूचना मागविण्यास मान्यता द्यावी अशी मुख्यसभेची शिफारस आहे.

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ३८६, दि. १८/१२/२००८ चा झाला आहे.)

**<u>विषय क्र. ४४३</u>**

संदर्भ :– १) मा. महा. आयुक्त यांचे मआ/नअ/८११, दि. १५/११/०८ चे पत्र.
२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १८२, दि. ८/१२/२००८.

---

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाकडून विविध कारणामुळे जागा संपादन करताना माहे सप्टेंबर २००८ मध्ये खालीलप्रमाणे अदा करणेत आलेल्या टी.डी.आर. ची. माहिती मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | आरक्षणाचा स.नं. | आरक्षणाचा प्रकार | डी.आर.सी. होल्डरचे नाव | टी.डी. आर. झोन | क्षे.चौ.मी. | डी.आर. सी. क्र | डी.आर.सी. दिल्याचा दि. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुणे पेठ कोथरूड स.क्र.१३५ (पै.) + १३६ (पै) सि.स.क्र.७५० (पै.) | झोपडपट्टी पुनर्वसन योजना | विकसक श्री.रायचंद ब्रिललाल कंकलोल | सी | ३५७०.३५ | ३७४० | १/९/०८ |

पत्र.

३) मा. संचालक , नगर रचना यांचे पत्र जा.क्र. वि.यो.पुणे /नरयोक्र १/अ.भू.क्र.२६१/१७ डी/टीपीव्ही १/५७४, दि. २८/३/२००८.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/३१०, दि. २३/६/२००८ चे पत्र.

५) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९८, दि. १६/१२/२००८.

विषय :- पुणे पेठ शिवाजीनगर, फा.प्लॉ.क्र.२६१ / ९७ डी.टी.पी.स्कीम क्र.१ येथील मान्य विकास आराखडयातील चूक दुरूस्त करणेबाबत.

---

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ, शिवाजीनगर फा.प्लॉ.नं.२६१/९७ डी हे क्षेत्र सन १९८७ च्या मान्यताप्राप्त विकास आराखड्यानुसार अस्तित्वातील डेक्कन जिमखाना यासाठी असल्याचे आढळते परंतु याबाबत मा.संचालक यांचे संदर्भांकित पत्रानुसार जागेवरील विकास विचारात घेता विकास नियंत्रण नियमावलीतील नियम क्र. ६.६.२.१ ( ii ) मधील तरतुदीनुसार मा.महा.आयुक्त यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार बेसमॅप मधील त्रुटीमुळे अस्तित्वातील डेक्कन जिमखाना विभागाचे रूपांतर विषयांकिंत ठिकाणी निवासी विभागात करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

<u>विषय क्रं. ४४५</u>

संदर्भ :- १) मा.महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांचेकडील आदेश क्र. टीपीएस १८०३/२०४५/नवि-१३, दि. २४/८/२००४.

२) मा.अवर सचिव,महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, यांचेकडील जा.क्र. टीपीएस १८०३/२०४५/नवि-१३, दि. ७/५/२००५.

३) मा.संस्थापक, माईर्स एम.आय.टी.पुणे यांचे दि. १६/९/२००६ चे पत्र.

४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/नअ/८७९, दि. १२/१२/२००८.

५) मा.शहर सुधारणा ठराव क्र.४७९, दि. ३१/३/२००८.

६) मा.बंडू केमसे व मा.संतोष आरडे यांचे दि.२.१२.०८ चे फेरविचाराचे पत्र.

७) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. १९९, दि. १६/१२/२००८.

---

मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.४७९, दि. ३१.३.०८ चा फेरविचार करण्यात आला.

मा.महा.आयुक्त यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

मे.शासनाचे संदर्भ क्र. १ व २ चे आदेशानुसार कोथरूड स.नं.१२४ मधील एम.एन.या अद्याक्षराने दर्शविलेल्या मा.महा.आयुक्त यांचे पत्रासोबतचे शासनाच्या नकाशातील १२.० मी.रूंद .डी.पी.रस्ता वगळणेबाबतची कलम ३७(१) अन्वये कार्यवाही सुरू करणेसाठी मान्यता द्यावी, अशी मा.मुख्यसभेकडे शिफारस आहे.

**(टिप – मा.शहर सुधारणा समिती ठ.क्र.४७९, दि. ३१.३.०८ चा निरस्त करण्यात येत आहे. )**

<u>विषय क्र. ४४६</u>

संदर्भ :- १) मा. अविनाश बागवे, मा. किशोर शिंदे, मा. संजय नांदे यांचे १६/१२/२००८ चे पत्र.

२) मा. शहर सुधारणा समिती ठराव क्र. २००, दि. १६/१२/२००८.

---

गुंठेवारी कायद्यानुसार एकाच इमारतीमधील स्वतंत्र फ्लॅटची गुंठेवारी करून नियमीत करण्यास मान्यता द्यावी, अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

<u>महिला बाल कल्याण समितीचे ठराव</u>

चर्चेनुसार –

संदर्भ क्र. ४ चे मा. सभासदांचे फेरविचाराचे पत्र दफ्तरी दाखल करण्यात आले.

पुणे मनपा प्रशासनाचे नागरवस्ती विकास योजना विभागाकडील वस्ती सेवक या पदांवरील नेमणूकीबाबत पुणे मनपाने जाहिरातीमध्ये उल्लेख केलेल्याप्रमाणे मनपामध्ये झोपडपट्ट्यामध्ये समूह संघटिका म्हणून काम करणाऱ्या समूह संघटिकांचा नेमणूक करते वेळेस प्राधान्याने विचार केला जाईल असे नमूद केले असल्याने विषयपत्रामधील विशेष मागसवर्गीय़ प्रवर्ग मधील प्रतिक्षा यादी वरील श्रीमती मॅडम मंदाकिनी व्यंकटेश या जाहिरातीनुसार पात्र ठरत असल्याने – व त्यांना महानगरपालिका समूह संघटिका या पदावरील झोपडपट्टी मधील कामाचा ९ वर्षाचा अनुभव असल्याने त्यांचे नावे निवडयादी मधील अनुक्रम चार वि.मा.प्र. मध्ये समाविष्ट करण्यात येवून मा. आयुक्ताच्या विषयपत्रातील निवडयादीतील श्रीमती वाघमारे संजीवनी संभाजी यांचे नावे प्रतिक्षायादी मध्ये अनुक्रम दोन मध्ये समाविष्ट करण्यास व खालीलप्रमाणे सदर जागांवर नेमणूका करण्यास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५३ ( १ ) अन्वये मान्यता द्यावी अशी मुख्यसभेची शिफारस आहे.

खालील प्रतिक्षा यादी ही निवड यादीवरील उमेदवार वस्ती सेवक या पदावर रूजू झाल्यानंतर एक वर्षाच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. मात्र एक वर्षाच्या कालावधीनंतर ही प्रतिक्षा यादी संपुष्टात आली आहे असे समजण्यात येईल.

**– निवडयादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | सौ.टिळेकर सुजाता गणेश | इमाव |
| २) | श्री. धावडे रामदास दत्तात्रय | भज ( क ) |
| ३) | सौ.पवार पुजा विनोद | इमाव |
| ४) | श्रीमती मॅडम मंदाकिनी व्यंकटेश | विमाप्र |

**– प्रतिक्षायादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | गट |
|---|---|---|
| १) | कु.शिंदे मनिषा महेंद्र | इमाव |
| २) | श्रीमती वाघमारे संजिवनी संभाजी. | विमाप्र |
| ३) | सौ. एडके राजश्री तुकाराम | भज ( क ) |

(टिप :– सदर विषयाचा विचार माहे जानेवारी २००९ च्या कार्यपत्रिकेच्या वेळी करावा असा मनपा ठराव क्र. ४००, दि. २४/१२/२००८ चा झाला आहे.)

**विषय क्र. ४४८**

संदर्भ :– १) मा. अति. महा. आयुक्त (वि) यांचे जावक क्रं.मआ/उआ ( जिंघ )/एचओ/७५४, दिनांक १/११/२००८ चे पत्र.

२) महिला बाल कल्याण समिती ठराव ९४,दि.१०/१२/२००८.

–––

मा. अति. महा. आयुक्त (वि) यांनी त्यांच्या पत्रात दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून–

पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य खात्याकडे नर्सिंग ऑर्डर्ली ( समय वेतन श्रेणी रू. २६१० ते ४०००+मान्यभत्ते ) वर्ग – ४ च्या हुद्दयाचे रिक्त पद भरणेसाठी, खालीलप्रमाणे शिफारस केलेल्या निवडयादीस आणि प्रतीक्षायादीस व त्यावरील उमेदवाराची सदर पदाच्या जागा उपलब्धतेनुसार व आस्थापना विषयक बाबींचा विचार करून वेळोवेळी नेमणूक करणेस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३(१) प्रमाणे मान्यता द्यावी, मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

खालील प्रतिक्षायादी, निवडयादी मधील संख्ये इतके उमेदवार रूजू होईपर्यन्त किंवा एक वर्ष यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीपर्यन्त प्रतिक्षा यादी व निवडयादी अमलात राहील.

**– निवडयादी –**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] | |

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | श्री. बुर्डे नरेंद्र छगूराव | इमाव | -- |
| १२ | श्री. बागडे अविनाश गणपत | इमाव | -- |
| १३ | श्री.अंगीर हेमंत शंकर | इमाव | -- |
| १४ | श्री. काशिद सुरशे दिगंबर | इमाव | अपंग |
| १५ | श्री. गुजर गिरिधार गजानन | इमाव | अपंग |
| १६ | श्री.जाधवर महेश नागनाथ | भ.ज.ड. | -- |
| १७ | श्री. जाधव संजय छगन | वि.जा.अ. | -- |
| १८ | श्री. केंगले दत्तात्रय बबन | अ.ज. | प्रकल्पग्रस्त |
| १९ | श्रीमती दांडगे मंजुषा भास्कर | इमाव | महिला |
| २० | श्रीमती शिर्के मनिषा हरिभाऊ | इमाव | महिला |
| २१ | श्रीमती रायकर उज्वला नंदकुमार | इमाव | महिला |
| २२ | श्रीमती राजगुरव आश्विनी अरूण | इमाव | महिला |

**- प्रतिक्षायादी -**

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | जातीचा प्रवर्ग | समांतर आरक्षण |
|---|---|---|---|
| १) | श्रीमती जायभाय निलीत्तमा सुर्यभान | भज - ड | -- |
| २) | श्री. मुसुडगे गणेश वसंतराव | विजा ( अ ) | -- |
| ३) | श्री. मधवे बारकु भगवंता | अज | -- |
| ४) | श्री. मांडवकर प्रमोद केशव | इमाव | -- |
| ५) | श्री. टिळेकर बाळासाहेब परशुराम | इमाव | -- |
| ६) | श्री. वासकर अभिजीत राजाराम | इमाव | -- |
| ७) | श्री. शेवकरी अनिकेत मारूती | इमाव | -- |
| ८) | श्री. जाधव विकास छगनराव | इमाव | -- |
| ९) | श्री. सचिन गणपत घडशी | इमाव | -- |
| १०) | श्रीमती नगरकर चित्रा रमेश | इमाव | महिला |

## शिक्षण मंडळाचे पत्र

**विषय क्र. ४४९**

संदर्भ :- १) मा. विनायक चाचर व मा. मिलींद कांबळे, सदस्य शिक्षण मंडळ यांचा दिनांक २३/६/२००८ चे पत्र.

२) मा. शिक्षण मंडळ ठराव क्र. ५४, दिनांक २३/६/२००८.

---

मा. विनायक चाचर व मा. मिलींद कांबळे, सदस्य शिक्षण मंडळ यांचा प्रस्ताव अवलोकन केला. महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. एमएओ ३१०८/प्रक्र १८/(१)/प्रशा-२ दिनांक १५/५/२००८ अन्वये शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक विभाग पुणे महानगरपलिका या पदावर प्रतिनियुक्तीने दोन वर्षाच्या कालावधीसाठी श्री. सुधाकर मनोहर तांबे यांची नियुक्ती झालेली आहे.

शिक्षण प्रमुख शिक्षण मंडळ पुणे मनपा हे पद सध्या रिक्त असल्याने सदर पदाचा अतिरिक्त पदभार श्री. सुधाकर मनोहर तांबे, शिक्षणाधिकारी, माध्यमिक विभाग यांचेकडे दिलेला आहे. वास्तविक पाहता शिक्षण प्रमुख पदाच्या कामाचा आवाका जास्त असल्याने सदर पदाचा श्री. सुधाकर तांबे यांचेकडे पूर्णवेळ पदभार देणे आवश्यक आहे.

श्री. सुधाकर तांबे यांनी यापूर्वी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे शिक्षण प्रमुख म्हणून अतिशय यशस्वीपणे काम केलेले आहे, त्यांच्या अनुभवाचा पुणे मनपा शिक्षण मंडळाकडील शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावणेसाठी निश्चित उपयोग होणार असल्याने श्री. सुधाकर तांबे यांची पुणे मनपा शिक्षण मंडळाकडे शिक्षण प्रमुख या पदावर प्रतिनियुक्तीने नेमणूक करण्यात यावी अशी महाराष्ट्र शासनाकडे विनंती करणेबाबत मा. मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

शिवाजीनगर, पुणे ४११००५. **उपनगरसचिव,**
दिनांक :– ९/१/२००९. पुणे महानगरपालिका.

**(टीप :– प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्रे (डॉकेटस्) मा. नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**

<u>पुणे महानगरपालिकेच्या कामाकरिता</u>

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक :– १४/१/२००९

संदर्भ :- मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेता, मा.सौ. दिपाली धुमाळ, मा. कर्णे गुरूजी, मा. शंकरराव बेलदरे पाटील, मा. संतोष फरांदे, मा.सौ. सुमन पठारे, मा. सौ. पार्वती भडके, मा. सौ. दिपाली ओसवाल, मा. श्रीमती लता राजगुरू, मा.सौ. वैजयंती पासलकर, मा.सौ.रिना पवार यांची सुचना दि. १९/८/२००८.

-----

श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी हे समर्थ प्रतिष्ठानच्या माध्यमातून अनेक समाजोपयोगी कार्य करीत आहेत. ते रेवदंडा येथील अध्यात्मिक प्रासादिक समितीचे प्रमुख असून, श्री. समर्थ रामदासांच्या श्रीमत दास बोधाच्या माध्यमातून निरूपणाव्दारे असंख्य लोकांचे अखंड प्रबोधन करीत असून प्रौढ साक्षरता वर्ग चालवित आहेत. बालसंस्कार वर्ग ज्या मध्ये समर्थ रामदासांच्या मनाचे श्लोकांव्दारे लहान मुलांचे प्रबोधन करतात जेणेकरून भावी पिढी सुसंस्कारीत व उत्तम आचरणसाठी तयार होईल. तसेच त्यांनी व्यसन मुक्ती सारखे कार्य केले आहे. पाणी आडवा पाणी जिरवा मोहिमेव्दारे रायगड, ठाणे जिल्ह्यात अनेक वनराई बंधारे तयार केले तसेच वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन कार्यात अग्रेसर आहेत. या कार्याबद्दल त्यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. तसेच सन २००७ मध्ये समर्थ व्यासपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

या त्यांच्या कार्याबद्दल पुणे मनपाच्या वतीने श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी यांचा मानपत्र देवून खास सत्कार करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ४५१</u>**

संदर्भ :- मा. प्रा. विकास मठकरी यांची सुचना दि. २३/९/२००८.

-----

भगवान गोगादेव यांना संपूर्ण भारतात सर्व धर्माचे व निरनिराळ्या जाती – पंतीचे लोक आदराने पूजन करतात. तरी पुणे महानगरपालिकेतर्फे साजऱ्या करण्यात येणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर फेस्टीव्हल, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे फेस्टीव्हलच्या धर्तीवर आगामी वर्षापासून भगवान गोगादेव फेस्टीव्हल सुध्दा साजरा करण्यात यावा.

**<u>विषय क्रं. ४५२</u>**

संदर्भ :- मा. अशोक येनपुरे यांची सुचना दि. १/१०/२००८.

-----

वॉर्ड क्र. ८२ सुभाषनगर येथे पुणे मनपाच्या वतीने बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेचे उद्‌घाटन ना. नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री, गुजराथ राज्य, यांचे शुभहस्ते व मा. नितीनजी गडकरी, प्रदेश भा. ज. पा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य, व श्रीमती रेखाताई प्रमोद महाजन यांचे प्रमुख उपस्थितीत करण्यात यावे. या समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून मा. गिरीष बापट, आमदार, मा. गोपीनाथ मुंडे, सरचिटणीस भा. ज. पा., मा. अनिल भोसले, सभागृहनेते, मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. चंद्रकांतजी मोकाटे, उपमहापौर, मा. प्रा. विकास मठकरी, माजी विरोधी पक्षनेता यांना निमंत्रित करण्यात यावे.

याप्रमाणे समारंभाची आखणी करण्यास व समारंभाचे अधिकार मा. महापौर यांना देण्यात यावेत.

**<u>विषय क्रं. ४५३</u>**

संदर्भ :- मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती व मा. अरिफ बागवान यांची सुचना दि.६/११/२००८.

-----

२६ नोव्हेंबर भारतीय संविधानाचा स्थापना दिन असून त्यानिमित्त संविधानाचे उद्‌देशीकाचे

करण्यात आलेल्या '' जॉगिंग ट्रॅक '' व '' कै. गंगुबाई भिमाले उद्यानाचा '' नामकरण व उद्‌घाटन समारंभ मंगळवार दि. २५ नोव्हेंबर २००८ रोजी सायंकाळी ७.०० (सात) वाजता मा. सौ. राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांचे शुभहस्ते व मा. शाम देशपांडे, अध्यक्ष, स्थायी समिती व पक्षनेते शिवसेना, मा. अनिल शिवाजीराव भोसले, सभागृह नेता, मा. उल्हास उर्फ आबा बागुल, विरोधी पक्षनेते, मा. अनिल शिरोळे, नगरसेवक, मा. प्रा. विकास मठकरी, पक्षनेते, भाजपा, मा. रविंद्र धंगेकर, पक्षनेते मनसे, मा. महेश लडकत, अध्यक्ष, शिक्षण मंडख, मा. अशोक हरणावळ, अध्यक्ष, सहकारनगर प्रभाग समिती, मा. दिपक उर्फ बाळासाहेब बोडके, अध्यक्ष, नाव समिती, मा. गणेश बिडकर, अध्यक्ष, शहर सुधारणा समिती, मा. सौ. वंदना श्रीनाथ भिमाले, स्थानिक नगरसेविका, मा. श्रीनाथ भिमाले, माजी नगरसेवक इत्यादी प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आला त्यास पश्चात मान्यता देण्यात येत आहे.

**(टिप:–वि.क्र.४५० ते ४५४ हे दि.१६/१२/२००८ च्या पक्षनेते सभेत फेरफारासह मान्य झाले आहेत.)**

**<u>विषय क्रं. ४५५</u>**

संदर्भ :– **मा. उज्वल केसकर व मा. अशोक येनपुरे यांची सुचना दि. ५/१/२००९.**

१) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजि)/७६३ दि. २१/११/२००७ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १२५५, दि. ४/१२/२००७.

–––

स्थायी समितीची शिफारस विचारात घेवून –

पुणे पेठ एरंडवणा, फा.प्लॉट नं. ९ अे मनपा दवाखाना येथील (तळमजला+पहिला मजला) व्यायामशाळा व योगमंदिर बांधकाम क्षेत्रफळ २०९.११ चौ.मी.जागा ३ वर्षे मुदतीसाठी भाडेपट्टा कराराने देणेबाबत निविदा मागविल्या असता आलेल्या ५ निविदांपैकी अ.क्र. १ ते ४ या ठेकेदारांनी माघार घेतल्याने अ.क्र.५ चे ठेकेदार श्री. विश्राम आर. कुलकर्णी, नंदनवन डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे यांनी दिलेला दर निर्धारित भाड्या पेक्षा जास्त असल्याने त्यांनी देवू केलेले मासिक भाडे र.रुपये १६,०००/– स्विकारून सदरची व्यायामशाळा व योगमंदिर ताबा दिनांकापासून ३ वर्षे कालावधीसाठी चालविणेस देणेस तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळच्यावेळी भरणेस व ताबा देणेपुर्वी ६ महिन्याचे मासिक भाडे अनामत म्हणून व ३ महिन्यांचे आगाऊ मासिक भाडे स्विकारणेस तसेच मासिक भाडे रकमेत प्रतिवर्षी १२% वाढ करुन भाडे तत्वावर चालविणेस देणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील मुख्य सभा ठराव क्र. ३२९, दिनांक २४/१/२००८ हा मान्य झाला असून सदर मुख्य सभा ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजि)/७६३ दि. २१/११/२००७ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. १२५५, दि. ४/१२/२००७.

३) मुख्य सभा ठराव क्र. ३२९, दिनांक २४/१/२००८.

–––

पुणे पेठ एरंडवणा, फा.प्लॉट नं. ९ अे मनपा दवाखाना येथील (तळमजला+पहिला मजला) व्यायामशाळा व योगमंदिर बांधकाम क्षेत्रफळ २०९.११ चौ.मी.जागा ३० वर्षे मुदतीसाठी भाडेपट्टा कराराने देणेस तसेच प्रतिवर्षी सुचविण्यात आलेली १२% वाढ रद्द करण्यात यावी.

**<u>विषय क्रं. ४५६</u>**

संदर्भ :– **मा. उज्वल केसकर व मा. अशोक येनपुरे यांची सुचना दि. ५/१/२००९.**

१) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजि)/१३५७ दि. १२/३/२००८ चे पत्र.

२) स्थायी समिती ठराव क्र. २०३४, दि.१३/३/२००८.

–––

मासिक भाडे स्विकारणेस त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील मुख्य सभा ठराव क्र. ४७, दिनांक २३/४/२००८ हा मान्य झाला असून सदर मुख्य सभा ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भुजि)/१३५७ दि. १२/३/२००८ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. २०३४, दि.१३/३/२००८.
३) मुख्य सभा ठराव क्र. ४७, दिनांक २३/४/२००८.

–––

पुणे पेठ एरंडवणा फा.प्लॉट नं. ९अे पार्ट येथे कै.अनुसयाबाई खिलारे प्राथमिक शाळेच्या आवारात बांधलेल्या इमारतीमधील तळमजल्यावरील अभ्यासिका हॉल व पहिल्या मजल्यावरील खोली क्षेत्रफळ १०८.३७ चौ.मी. जागा ताबा दिनांकापासून ३० वर्षे कालावधीसाठी भाडेपट्टा करारावर देणेस तसेच प्रतिवर्षी सुचविण्यात आलेली १२% भाडेवाढ रद्द करुन ३० वर्षाकरिता मासिक भाडे र. रु. १०,६२२/– स्विकारुन त्याप्रमाणे करारनामा करणेस मान्यता देण्यात यावी.

**<u>विषय क्रं. ४५७</u>**

संदर्भ :– **मा. उज्ज्वल केसकर व मा. अशोक येनपुरे यांची सुचना दि. ५/१/२००९.**
१) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूसंपादन)/८७२, दि. ४/११/२००६ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५०३, दि. २८/११/२००६.

–––

मा.महा.आयुक्त यांनी शिफारस केल्याप्रमाणे –

पुणे मनपाच्या पेठ एरंडवणा गावठान येथे कै.अनुसयाबाई खिलारे प्राथमिक शाळेच्या आवारात बांधण्यात आलेली पहिल्या मजल्यावरील अभ्यासिकेचे क्षेत्रफळ ८०.०५ चौ.मी. असून पाच वर्षे मुदतीसाठी चालविणेस देणेसाठी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदांपैकी अस्मिता प्रतिष्ठान, नंदनवन डहाणूकर कॉलनी, कोथरुड, पुणे २९ यांची निविदा सर्वात जास्त रकमेची असल्याने त्यांनी देवू केलेली मक्त्याची र.रुपये ७,०००/– प्रती महा तसेच मनपाचे येणारे सर्व कर सदरच्या ठेकेदाराने वेळेच्यावेळी भरणेस व ताबा देण्यापूर्वी ६ महिन्यांचे भाडे अनामत म्हणून व ३ महिन्यांचे आगाऊ मासिक भाडे स्विकारणेस तसेच सदरचे भाड्याचे मूळ रकमेत प्रतिवर्षी १२% वाढ करुन भाडेतत्वावर ताबा दिनांकापासून ५ वर्षे चालविणेस देणेस व त्याप्रमाणे त्यांचेशी करारनामा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वरील मुख्य सभा ठराव क्र. ४४३, दिनांक १३/२/२००७ हा झाला असून सदर मुख्य सभा ठरावाचा फेरविचार करुन खालीलप्रमाणे ठराव मान्य करण्यात यावा.

संदर्भ :– १) मा.महा.आयुक्त यांचे क्र. मआ/उआ(भूसंपादन)/८७२, दि. ४/११/२००६ चे पत्र.
२) स्थायी समिती ठराव क्र. १५०३, दि. २८/११/२००६.
३) मुख्य सभा ठराव क्र. ४४३, दिनांक १३/२/२००७.

–––

पुणे मनपाच्या पेठ एरंडवणा गावठान येथे कै.अनुसयाबाई खिलारे प्राथमिक शाळेच्या आवारात बांधण्यात आलेली पहिल्या मजल्यावरील अभ्यासिकेचे क्षेत्रफळ ८०.०५ चौ.मी. असून ३० वर्षे मुदतीसाठी चालविणेस देणेसाठी तसेच सदरचे भाड्याचे मूळ रकमेत सुचविण्यात आलेली प्रतिवर्षी १२% भाडेवाढ रद्द करण्यात यावी.